महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id : pmcmco@gmail.com
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/४९९
दिनांक : ०३ /०५ /२०२०

**: आदेश :**

**विषय :-** कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण- पुणे महापालिका क्षेत्रासाठी सुधारित आदेश.

**संदर्भ :-** १) कोविड-१९,प्रतिबंधात्मक उपाययोजनां करिता सुधारित एकत्रित मार्गदर्शक सूचना आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1, दि.१७/०४/२०२०, दि.२१/०४/२०२०; आणि दि.२३/०४/२०२०

२) अधिसुचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई, क्र.करोना २०२०/प्र.क्र५८/ आरोग्य ५,दि.१४ मार्च २०२०.

३) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

४) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

५) या कार्यालयाचे,जा.क्र.२८, दि.१३.०४.२०२०

६) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,क्र.जि.आ.व्य./१२४/२०२० पुणे.दिनांक.१५/०३/२०२० यांचे आदेश.

७) पोलिस सह आयुक्त यांचे जा.क्र.४१६७/कोरोना/मनाई/आदेश/२०२०, दि.१४.४.२०२०

८) या कार्यालयाचे,जा.क्र. मआ/साप्रवि/२५४, दिनांक १९/०४/२०२०

९) या कार्यालयाचे,जा.क्र. मआ/साप्रवि/३९१, दिनांक २७/०४/२०२०

१०) कोविड-१९,प्रतिबंधात्मक उपाययोजनां करिता सुधारित एकत्रित मार्गदर्शक सूचना, आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1, दि.०२/०५/२०२० व दि.०३.०५.२०२०

ज्याअर्थी राज्यात कोरोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य आजारामुळे पुणे शहरात आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली आहे.

ज्याअर्थी जागतिक आरोग्य संघटना तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार यानी या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव प्रस्तावित केलेल्या विविध उपाय

योजनाची प्रभावी अंमलबजावणी व राज्यात कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रात आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

राज्य शासनाने संदर्भ क्र. १ मधील दि.१७/०४/२०२० नुसार पुणे शहरात कोरोनाचा उद्रेक (HOTSPOT) झाल्याने यापूर्वीच संपूर्ण पुणे महानगरपालिका क्षेत्र संक्रमणशील भाग हे प्रतिबंधित भाग (Containment Zone) म्हणून घोषित करण्यात आले होते.

दि. ०९ मार्च २०२० पासून ०२ मे २०२० पर्यंत शहरातील कोरोना पॉझीटीव्ह रुग्णांची संख्या जीआयएस नकाशावर घेतली असता शहरातील काही ठराविक भाग मनपा वॉर्ड / झोन / पोलीस स्टेशन क्षेत्र / वस्ती / गल्ली / कॉलोनी मध्ये प्रामुख्याने कोरोनाचा उद्रेक झाल्याचे स्पष्ट होत आहे.

त्याअर्थी पुणे शहरातील असे पॉझीटीव्ह रुग्ण असलेला बहुसंख्य भाग हा सोबत जोडलेल्या **ठराविक वस्त्यांमध्ये केन्द्रीभूत** झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पुणे शहराचा प्रतिबंधित भाग (Containment Zone) ज्या ठराविक भाग मनपा वॉर्ड / झोन / पोलीस स्टेशन क्षेत्र / वस्ती/ गल्ली / कॉलोनी मध्ये कोरोनाचा उद्रेक झालेला आहे, त्या क्षेत्रा पुरताच मर्यादित ठेवणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी मी, शेखर गायकवाड, आयुक्त, पुणे महानगरपालिका, मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये** आज रविवार दि. ०३ मे २०२० मध्यरात्री १२ वाजेपासून ते १७ मे २०२० पर्यंत किंवा राज्य शासनाने मुदतवाढ दिल्यास त्या दिनांकापर्यंत, पुणे महापलिका हद्दी मधील केवळ सोबत जोडलेल्या अनुसूची–१ मधील **सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र** (Micro Containment Zone) हे संक्रमणशील क्षेत्र म्हणून जाहीर करीत आहे. अश्या क्षेत्रात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**अ) प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone)**

१) संबंधित पोलीस स्टेशन प्रमुख आपल्या अनुसूची-१ मधील भागाच्या हद्दी प्रतिबंधित (सील) करतील.

२) त्यानुसार महापालिकेच्या हद्दीमध्ये वैद्यकीय/आपत्कालीन सेवा व जीवनावश्यक वस्तूंच्या सेवा व पुरवठा सुरळीत राहण्याकरिता, या सेवा वगळता/पुरवठा वगळता अन्य व्यक्ती यांना संबंधित प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) मध्ये प्रवेश करण्यास व परिसरातून बाहेर पडण्यास बंदी करण्यात येत आहे.

३) प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) जाहीर केलेल्या क्षेत्रामध्ये अत्यावश्यक सेवा/वस्तू पुरवठा करण्याकरिता वेळ कोणता असेल याबाबत शासनाने ठरवून दिलेल्या विहित वेळमर्यादेत पोलीस आयुक्त स्वतंत्रपणे आदेश काढतील .

४) सदर परिसरात जीवनावश्यक वस्तुंचा / अत्यावश्यक सेवा पुरविणारे कार्यालय/ व्यक्तींना व त्यांच्या वाहनांना यामधून वगळण्यात येत आहे. जीवनावश्यक वस्तु व सेवा (दुध व दुग्धोत्पादन, किराणा माल, फळे व भाजीपाला इ.) यांच्या वाहतुकीसाठी कोणतेही निर्बंध नसून त्यांना त्यासाठी डिजीटल पासची आवश्यकता नसल्याचे यापुर्वी वेळोवेळी नमुद करणेत आले आहे.

**ब) प्रतिबंधित क्षेत्राबाहेर ( Outside Containment Zone)**

**१) प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) बाहेरील उर्वरित मनपा क्षेत्रामध्ये व्यापारी संकुला मधील केवळ अत्यावश्यक वस्तूंची दुकाने सुरु राहतील.**

**२) त्या व्यतिरिक्त रस्त्यावरील दुकानांपैकी स्वतंत्र दुकाने, रहिवाशी कॉलनीतील दुकाने, व रहिवाशी संकुलातील दुकाने उघडी राहतील. तथापि, पुणे मनपा क्षेत्रातील एखाद्या रस्त्यावर पाच (५) पेक्षा जास्त दुकाने असतील, तर अश्या रस्त्यावरील अत्यावश्यक सेवेची सर्व दुकाने व अत्यावश्यक सेवा नसलेली जास्तीत जास्त** पाच (५) बिगर अत्यावश्यक दुकानांना आणि तसेच राज्य शासनाने अनुज्ञेय केलेला व्यवसायांना परवानगी राहील.

३) केवळ अनुज्ञेय कामांसाठी वैयक्तिक वाहन वापरता येईल. तथापि, चार चाकी वाहनामध्ये चालका व्यतिरिक्त दोन व्यक्तींना परवानगी असेल, तर दुचाकी वाहनात मागच्या सीटवर व्यक्तीला नेता येणार नाही.

४) पुणे मनपाने ज्या पूर्व पावसाळी कामांना, मेट्रोच्या कामांना, धोकादायक इमारतीबाबत करावयाची कारवाई तसेच पूरपरिस्थिती होऊ नये म्हणून ज्या कामांना पूर्व परवानगी देण्यात आलेली आहे, अशी कामे सुरु राहतील.

५) प्रतिबंधित क्षेत्राबाहेर शहरी भागामध्ये बाहेरील मजूर न आणता त्याजागेवर (In situ) मजुरांची राहण्याची व्यवस्था होत असेल तर अशी बांधकामे आणि अपारंपरिक उर्जा प्रकल्पांची कामे करता येतील.

६) ई-कॉमर्सच्या माध्यमातून घरपोच अत्यावश्यक वस्तूचे वितरण करता येईल.

**क) सर्वसाधारण सूचना -**

१) जीवनावश्यक वस्तु विक्रेते (दुध व दुग्धोत्पादन, किराणा माल, फळे व भाजीपाला, घरगुती गॅस सिलेंडर, पेट्रोलपंप, रेशन दुकान इ.) तसेच इतर अत्यावश्यक सेवांशी संबंधित व्यक्तीबाबत यापूर्वी पोलीस, शासनाचे विविध इतर विभाग व कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी पास व परस्पर पुरक यंत्रणा निर्माण केली आहे. ती यापुढील मनाई कालावधीत तशीच चालु राहील.

२) सदर आदेशान्वये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नियुक्त अधिकारी/कर्मचारी, कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काम करणारे तसेच पुणे महानगरपालिकेचे

सर्व कर्मचारी व वाहने तसेच शासकीय व अन्य अत्यावश्यक सेवा देण्यात येणाऱ्या वाहनांना सदरच्या आदेशानुसार वगळण्यात येत आहे.

३) तसेच पुणे महापालिका क्षेत्रामधील सर्व शासकीय कार्यालयांनी त्यांच्या कार्यालयात उपस्थिती राखण्याबाबत संदर्भ क्र.१० मधील अ.क्र.७ (ii)(g) अन्वये नियोजन करणे आवश्यक राहील. शासकीय कार्यालयांना त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक पास महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करून दिले जातील.

४) जिल्हा दंडाधिकारी यांचेकडील उपरोक्त संदर्भ क्र. ६ च्या आदेशान्वये सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त,पुणे मनपा यांची त्याच्या कार्यक्षेत्राकरिता सनियंत्रण अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली असून संबधित महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात रस्त्यावर विनाकारण फिरणारे नागरिक आढळल्यास त्याच्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करावी.

हा आदेश आज दिनांक ०३ मे २०२० रोजी माझ्या सही शिक्याने दिला आहे.

(शेखर गायकवाड)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका,पुणे.

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

३) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

## अनुसूची 1
## पुणे महानगरपालिकेतील संक्रमणशील क्षेत्र (Micro Containment Zone)

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| 1 | मंगळवार पेठ, जूना बाजार | कसबा - विश्रामबागवाडा | जुनाबाजार- मंगळवार पेठ- जुना बाजार परिसर ( फायनल प्लॉट क्र 897, 898) |
| 2 | पर्वतीदर्शन परिसर 1 | कसबा - विश्रामबागवाडा | वेलणकरनगर, लक्ष्मीनारायण थिएटर, पर्वती दर्शन, एस.टी कॉलनी, हॉटेल पंचमी परिसर |
| 3 | पर्वतीदर्शन परिसर 2 | कसबा - विश्रामबागवाडा | रामभाऊ म्हाळगी रस्त्याच्या पश्चिमेकडील पर्वतीदर्शन वसाहत |
| 4 | पर्वती चाळ क्र. ५२ झोपडपट्टी | कसबा - विश्रामबागवाडा | पर्वती फायनल प्लॉट क्रमांक 526A व 526B |
| 5 | पर्वती दांडेकर पूल झोपडपट्टी | कसबा - विश्रामबागवाडा | दांडेकर पूल वसाहत फायनल प्लॉट क्रमांक 1A, 2A, 2B, 28, 585, 587, 587 पैकी आंबील ओढा कॉलनी परिसर |
| 6 | पर्वती दत्तवाडी | कसबा - विश्रामबागवाडा | पर्वती पर्वती फायनल प्लॉट क्रमांक 558 दत्तवाडी परिसर |
| 7 | पर्वती इंदिरानगर झोपडपट्टी नीलायम टॉकीजजवळ १ | कसबा - विश्रामबागवाडा | पर्वती फायनल प्लॉट क्रमांक 29 B व 29 A निलायम थीएटर जवळील इंदिरा नगर वसाहत |
| 8 | पर्वती इंदिरानगर झोपडपट्टी नीलायम टॉकीजजवळ २ | कसबा - विश्रामबागवाडा | पर्वती फायनल प्लॉट क्रमांक 587 /4 आंबील ओढ्यालगत इंदिरानगर वसाहत |
| 9 | शहर मध्यवर्ती भाग कसबा, नाना, भवानी पेठ | कसबा - विश्रामबागवाडा, भवानी पेठ | कसबा, विश्रामबागवाडा, भवानी पेठ- सोमवार पेठ, मंगळवार पेठ, बुधवार पेठ (पै), गुरुवार पेठ, शुक्रवार पेठ(पै), रविवार पेठ, रास्ता पेठ, नाना पेठ, भवानी पेठ, महात्मा फुले पेठ (गंज पेठ), गणेश पेठ, कसबा पेठ, घोरपडी पेठ. |
| 10 | कोंढवा बुद्रुक काकडेवस्ती | कोंढवा - येवलेवाडी | पश्चिमेस: आई माता मंदिर ते कोंढवा बुद्रुक जाणारा रस्ता, उत्तरेस ईशा पर्ल सोसायटी रस्ता, दक्षिणेस : रीषा एनक्लेव इमारत रस्ता, पूर्वेस: हॉटेल रुचिरा फूड परिसर साई कुंज |
| 11 | कोंढवा बुद्रुक, नॉटिंग हिल सोसायटी | कोंढवा - येवलेवाडी | कोंढवा बुद्रुक नॉटिंग हिल सोसायटी संपूर्ण नॉटिंग सोसायटी परिसर |

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| 12 | उंड्री, होलेवस्ती | कोंढवा - येवलेवाडी | कात्रज बायपास रस्ता दक्षिणेस ड्रीम होम सोसायटी उत्तरेस हॉटेल वेदांत पावभाजी पश्चिमेस रस्ता |
| 13 | कात्रज, सुखसागरनगर, अंबामाता मंदिर परिसर | कोंढवा - येवलेवाडी | कात्रज. स.क्र. 13,16,17 पैकी सुखसागर नगर अंबामाता मंदीर परिसर |
| 14 | कोथरूड, शिवतारा इमारत बधाई स्वीटजवळ | कोथरूड - बावधन | कोथरूड शिवतारा सोसायटी सर्वे नंबर 46 पैकी कोथरूड |
| 15 | कोथरूड चंद्रगुप्त सोसायटी, महाराज कॉम्प्लेक्स मागे | कोथरूड - बावधन | सर्वे नंबर 81 पैकी कोथरूड चंद्रगुप्त सोसायटी महाराजा कॉम्प्लेक्स इत्यादी |
| 16 | पुणे स्टेशन, ताडीवाला रोड | ढोले पाटील रोड | उत्तरेस : मुळामुठा नदी<br>पश्चिमेस : लडकत वाडी रस्ता ढोले-पाटील ग्राऊंडच्या पूर्वेकडील रेल्वे रस्ता व रेल्वे बुकिंग ऑफिस कडे जाणारा रस्ता<br>दक्षिणेस : विभागीय रेल्वे मॅनेजर ऑफिस<br>पश्चिमेस : प्रायव्हेट रोडच्या पश्चिमेची हद्द |
| 17 | शिवाजीनगर रेल्वे स्टेशन दक्षिणेकडील वसाहत | शिवाजीनगर - घोलेरोड | शिवाजीनगर रेल्वे लाईन दक्षिणेकडील वसाहत फायनल प्लॉट क्र 11,23,24,25,26, 29 पै. शिवाजीनगर |
| 18 | घोरपडी, बालाजीनगर, विकासनगर | ढोले पाटील रोड | पूर्वेस भैरोबा नाला पश्चिमेस पुणे मिरज रेल्वे लाईन दक्षिणेस पुणे मिरज रेल्वे पूल भैरोबा नाला वरील उत्तरेस पुणे मनपा हद्द पुणे घोरपडी गाव परिसर चर्च ऑफ होली रॉक तलीमुल इस्लाम मस्जिद परिसर |
| 19 | पर्वती, तळजाई वस्ती १ | धनकवडी - सहकारनगर | गोळवलकर गुरुजी पथाचे पश्चिमेकडील तळजाई वसाहत |
| 20 | पर्वती, तळजाई वस्ती २ | धनकवडी - सहकारनगर | सुवर्ण सोसायटी, वीर लहूजी सोसायटी |
| 21 | धनकवडी, बालाजी नगर | धनकवडी - सहकारनगर | बालाजीनगर वसाहत, धनकवडी, स.नं. 20, 21, 22, 23 मधील क्षेत्र |
| 22 | पर्वती शिवदर्शन १ | धनकवडी - सहकारनगर | रामभाऊ म्हाळगी पथाचे पश्चिमेकडील वसाहत |
| 23 | पर्वती शिवदर्शन २ | धनकवडी - सहकारनगर | रामभाऊ म्हाळगी पथाचे पूर्वेकडील वसाहत |

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| 24 | धनकवडी, गुलाबनगर चैतन्यनगर | धनकवडी - सहकारनगर | धनकवडी स.क्र. 32,33 गुलाबनगर, चैतन्य नगर |
| 25 | आंबेगाव खुर्द जांभूळवाडी साईसमृद्धी परिसर | धनकवडी - सहकारनगर | वरद मेडिकल परिसर समृद्धी प्रेस्टिज परिसर आस्था अपार्टमेंट परिसर स्नेहल संकुल परिसर स्वप्नशिल्प बिल्डींग परिसर |
| 26 | वडगावशेरी, गणेशनगर | नगर रोड - वडगावशेरी | स.नं. 48 पैकी वडगावशेरी, गणेशनगर परिसर |
| 27 | वडगावशेरी, रामनगर, टेम्पो चौक | नगर रोड - वडगावशेरी | स.नं. 37 पैकी वडगावशेरी, रामनगर परीसर पैकी |
| 28 | लोहगाव, कालवडवस्ती | नगर रोड - वडगावशेरी | स.नं. 246 पैकी लोहगांव, कलवडवस्ती पैकी |
| 29 | बिबवेवाडी, आंबेडकरनगर मार्केटयार्ड | बिबवेवाडी | बिबवेवाडी स.नं. 570, आंबेडकरनगर वसाहत |
| 30 | गुलटेकडी, डायसप्लॉट | बिबवेवाडी | फा.प्लॉट नंबर 429 डायसप्लॉट वसाहत |
| 31 | गुलटेकडी, मीनाताई ठाकरेनगर | बिबवेवाडी | गुलटेकडी फा. प्लॉट क्रमांक 427, मीनाताई ठाकरे वसाहत |
| 32 | बिबवेवाडी, अप्पर इंदिरानगर | बिबवेवाडी | बिबवेवाडी- स.क्र. 640, 648, 659, पैकी अप्पर इंदिरा नगर वसाहत. |
| 33 | बिबवेवाडी, स.नं.६५० | बिबवेवाडी | बिबवेवाडी- स.क्र. 649, 650, 651, 652 पैकी आईमाता मंदिरचे पाठीमागे व परिसर |
| 34 | बिबवेवाडी गुलटेकडी, सेव्हन डे अडव्हेंटीज मिशन | बिबवेवाडी | बिबवेवाडी- स.क्र. 584, 585, 586 पैकी फ्लॅट क्र. 447 सेव्हन्य ॲडव्हेन्टीस्ट |
| 35 | बिबवेवाडी, गुलटेकडी, ढोलेमळा झोपडपट्टी | बिबवेवाडी | बिबवेवाडी- फ्लॅट क्र. 430 ए-1 ए-2, व 430 बी, 430 क्षेत्र |
| 36 | बिबवेवाडी, प्रेमनगर झोपडपट्टी | बिबवेवाडी | बिबवेवाडी- स.क्र. 690 पै प्रेमनगर वसाहत |
| 37 | येरवडा गांधीनगर | येरवडा - कळस धानोरी | स.नं. 103 येरवडा जयप्रकाशनगर, गांधीनगर |
| 38 | येरवडा गांधीनगर २ | येरवडा - कळस धानोरी | स.नं. 103 पैकी गांधीनगर, येरवडा क्षेत्रीय कार्यालय पश्चिमेस |
| 39 | येरवडा ताडीगुत्ता | येरवडा - कळस धानोरी | येरवडा टी.पी. स्कीम फा.प्लॉट 70/1, 70/3 |
| 40 | येरवडा, नागपूर चाळ | येरवडा - कळस धानोरी | नागपूर चाळ व हौसिंग बोर्ड वसाहत पैकी |

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| 41 | येरवडा, आदर्श इंदिरानगर, आळंदी रस्ता | येरवडा - कळस धानोरी | येरवडा, आदर्श इंदिरानगर |
| 42 | येरवडा, फुलेनगर, आळंदी रोड | येरवडा - कळस धानोरी | येरवडा, फुलेनगर, म्हाडा वसाहत |
| 43 | कळस, जाधववस्ती | येरवडा - कळस धानोरी | स.नं.116 पैकी कळस, जाधववस्ती |
| 44 | येरवडा प्रभाग क्र. ६ | येरवडा - कळस धानोरी | लूपरस्ता, जेल रस्ता, हॉट मिक्स प्लांट रस्ता, पुणे नगर रस्ता यामधील संपूर्ण भाग येरवडा गावठाण नवीन खडकी गावठाण गणेश नगर, मदर टेरेसा नगर, लक्ष्मी नगर, सुभाषनगर, अशोकनगर, बालाजीनगर, कामराजनगर इत्यादी |
| 45 | हडपसर, रामनगर | वानवडी - रामटेकडी | शारदाबाई लोंढे शाळा, स.नं.110 रामटेकडी, रामनगर मस्जिद परिसर टाकवस्ती |
| 46 | हडपसर, रामटेकडी | वानवडी - रामटेकडी | गुड शेफर्ड, कमिटी चर्च, अंधशाळा, विठ्ठलमंदिर परिसर, वाल्मीकी वस्ती, प्रथमा बिल्डिंग, एस आर ए परिसर |
| 47 | हडपसर, गोसावीवस्ती, वैदूवाडी | वानवडी - रामटेकडी | वैदुवाडी, रिद्धी सिद्धी बिल्डींग परिसर, लक्ष्मी माता मंदिर परिसर, डायमंड बेकरी परिसर, ओंकार हॉस्पिटल परिसर, सिल्वर टॉवर परिसर |
| 48 | हडपसर, सय्यदनगर १ | वानवडी - रामटेकडी | सय्यदनगर गल्ली क्रमांक १अ ते ६अ सय्यद नगर रेल्वे गेट जवळील परिसर |
| 49 | हडपसर, सय्यदनगर २ | वानवडी - रामटेकडी | आशियाना हॉल परिसर, गल्ली नंबर ८अ ते २८ अ, आशाबी रसूल मस्जिद परिसर |
| 50 | हडपसर, सय्यद नगर ३, गुलामअली नगर | वानवडी - रामटेकडी | कॅनरा बँक एटीएम परिसर, प्रथम अपार्टमेंट परिसर, जामा मस्जिद परिसर, नवजीवन नर्सिंग होम परिसर, कमल हॉस्पिटल परिसर, सय्यदनगर गल्ली क्रमांक 1ब ते 15ब |
| 51 | हडपसर, गुलामअलीनगर | वानवडी - रामटेकडी | गुलामअलीनगर मधील सर्व गल्ल्या, युसुफिया मस्जिद परिसर, आयडियल इंग्लिश मीडियम प्राइमरी स्कूल परिसर, गरीब नवाज मस्जिद परिसर |

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| 52 | कोंढवा खुर्द शिवनेरी नगर | वानवडी - रामटेकडी | कोंढवा खुर्द गावठाण परिसर, श्रीहंसनगर परिसर, श्रीहंसनगर गल्ली क्रमांक १ ते ३६, पर्ल ड्रॉप स्कूल परिसर |
| 53 | कोंढवा खुर्द भाग्योदयनगर | वानवडी - रामटेकडी | भाग्योदयनगर, कोंढवा रस्ता, उत्तरेस: भाग्योदयनगर रस्ता दक्षिणेस: शितल पेट्रोल पंप परी पश्चिमेस: बंधननगर परिसर उमर परिसर साहिल मस्जिद परिसर |
| 54 | कोंढवा खुर्द तांबोळी बाजार | वानवडी - रामटेकडी | मिठानगर परिसर, गगन इम्राल्ड सोसायटी परिसर, अल नूर मस्जिद परिसर, अक्षर धाम सोसायटी परिसर, माउंट हेवन सोसायटी परिसर, पश्चिमेस : महाराष्ट्र ट्रस्ट एज्युकेशनल ट्रस्ट कॉलेज एज्युकेशन ट्रस्ट मिठानगर गल्ली क्रमांक 1 ते 18 |
| 55 | कोंढवा खुर्द मिठानगर | वानवडी - रामटेकडी | पूर्वेस: भैरोबा नाला व कोंढवा रस्ता, पश्चिमेकडील युनिटी पार्क को. ऑप. सोसायटी व रस्ता, उत्तरेस : अशोका म्युज सोसायटी, दक्षिणेस : अश्रफनगर परिसर |
| 56 | वानवडी, एस.आर.पी.एफ. | वानवडी - रामटेकडी | उत्तरेस : एस एस आर पी एफ ग्रुप (एक) स्विमिंग पूल<br>पूर्वेस : नानावटी नगर रस्ता<br>दक्षिणेस : नानावटी नगर कडे जाणारा रस्ता<br>पश्चिमेस : एसआरपीएफ मुख्य रस्ता |
| 57 | शिवाजीनगर, कामगार पुतळा | शिवाजीनगर - घोलेरोड | शिवाजीनगर कामगार पुतळा वसाहत, जुना तोफखाना, राजीव गांधीनगर |
| 58 | शिवाजीनगर, महात्मा गांधी झोपडपट्टी | शिवाजीनगर - घोलेरोड | महात्मा गांधी वसाहत- शिवाजीनगर- पाटकर प्लॉट, महात्मा गांधी नगर (फायनल प्लॉट क्र 67) |
| 59 | शिवाजीनगर, पाटील इस्टेट | शिवाजीनगर - घोलेरोड | पाटील इस्टेट- पाटील इस्टेट वसाहत फायनल प्लॉट क्र 65+66 शिवाजीनगर |
| 60 | शिवाजीनगर रेल्वे लाईन उत्तरेकडील बाजू | शिवाजीनगर - घोलेरोड | शिवाजीनगर रेल्वे लाईन उत्तरेकडील विष्णुकृपा नगर फायनल प्लॉट क्र 29 पै. शिवाजीनगर |
| 61 | शिवाजीनगर, न. ता. वाडी | शिवाजीनगर - घोलेरोड | फायनल प्लॉट क्र. 46+47+48 शिवाजीनगर न.ता.वाडी पैकी |

| अ.क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| 62 | शिवाजीनगर, कामगार आयुक्त कार्यालयालगतची झोपडपट्टी | शिवाजीनगर - घोलेरोड | भोसलेवाडी, वाकडेवाडी, फा.प्लॉट क्र. 58 पैकी व 59 पैकी |
| 63 | शिवाजीनगर कॉंग्रेस भवन पाठीमागील बाजू | शिवाजीनगर - घोलेरोड | शिवाजीनगर गावठाण पै. शिवाजीनगर फायनल प्लॉट 751 ते 775, 778, ते 779, इ. (नकाशाप्रमाणे) |
| 64 | हडपसर, चिंतामणीनगर, रेल्वे गेटजवळ | हडपसर - मुंढवा | सय्यदनगर मगर पेट्रोल पंपाजवळील परिसर, संत तेरेसा चर्च परिसर, एचडीएफसी बँक एटीएम परिसर, मारुती मंदिर परिसर |
| 65 | हडपसर, आदर्शकॉलनी | हडपसर - मुंढवा | गजानन कॉलनीमधील सर्व सहा गल्ल्या, आयसीआयसीआय बँक, (एटीएम) परिसर, हॉटेल संग्राम परिसर, अंजुमन खैरुल इस्लाम परिसर |
| 66 | हडपसर, वेताळनगर | हडपसर - मुंढवा | वेताळनगर परिसर, उत्तर बाजूस कॅनॉल, दक्षिण बाजूस ग्लायडिंग सेंटर, पश्चिम बाजूस ओढा व पूर्व बाजूस वेताळ बाबा मंदिर |
| 67 | हडपसर, सातववाडी | हडपसर - मुंढवा | उत्तरेस कॅनॉल, पश्चिमेस सासवडरस्ता, दक्षिणेस सूर्या ज्योती गॅस, पूर्वेस: पुणे मनपा सुलभ शौचालय |
| 68 | हडपसर माळवाडी | हडपसर - मुंढवा | राजर्षी शाहू सोसायटी परिसर, साई व्हिला अपार्टमेंट परिसर, दत्त मंदिर परिसर, मयूर जनरल स्टोअर परिसर, श्रीबालाजीनगर हॉटेल परिसर |
| 69 | हडपसर - हांडेवाडी रस्ता, इंदिरानगर | हडपसर - मुंढवा | हांडेवाडी रस्ता इंदिरानगर, हांडेवाडी -हडपसर रस्ता, दक्षिणेत शुभारंभ सोसायटी, पश्चिमेस फॉरेस्ट, उत्तरेस सुयश निसर्ग सोसायटी |

**शेखर गायकवाड**
**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका**